## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव** – मारुती गुंडू नाईक.

**वय** – ६० वर्ष, **व्यवसाय** – शेती,

**राहणार** – मेंढोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

## सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.

**१.** माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मी या खटल्यातील फिर्यादी व आरोपीला ओळखतो. दि.०४.०५.२०२४ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी फिर्यादीच्या *मानेचे टेक* नावाच्या शेतात बोलावले होते. त्यावेळी तेथे मी, दुसरा पंच जितेंद्र नांदवडेकर, फिर्यादी आणि पोलिस कर्मचारी हजर होते. पोलिसांनी तेथे आमच्या समक्ष फिर्यादीने दाखवलेल्या जागेचा पंचनामा केला होता. मला त्या जागेचा गट क्रमांक सांगता येणार नाही. या व्यतिरिक्त पोलिसांनी तेथे काहीही केले नव्हते. आता मला तो पंचनामा दाखवला, त्यावरती माझी स्वाक्षरी असून मला त्यातील मजकूरा बाबत माहिती नाही. मी पंचनामा करतेवेळी पोलिसांनी फिर्यादीने दाखवलेला कोयता जप्त केल्याचे पाहिले नाही.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन त्यास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**२.** आता मला दाखवलेल्या पंचनाम्यावरती आणि जप्त केलेल्या कोयत्या वरती माझी स्वाक्षरी आहे. मी पोलिसांनी बोलावल्यामुळे पंचनाम्यासाठी गेलो होतो. फिर्यादीने पोलिसांना जागेचा गट क्र.१८६ असल्याचे सांगितले होते. मी व जितेंद्र नांदवडेकर त्या पंचनाम्यासाठी सकाळी १०.०० ते १०.१५ वाजेच्या दरम्यान गेलो होतो. तो पंचनामा साधारणतः ११.१५ पर्यंत चालला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा करताना फिर्यादीने पोलिसांना कोयता दाखवला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो आमच्या समक्ष जप्त केला होता.

३. पोलिसांनी पंचनाम्याचे संपुर्ण कामकाज जागेवरती केले होते. त्यांनी आमच्या समक्ष सर्व कामकाज केल्यामुळे आम्ही त्यावरती स्वाक्षरी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी पंचनामा केल्यानंतर मी तो वाचून त्यावरती स्वाक्षरी केली होती. फिर्यादी व आरोपी माझ्या गावातील असून माझे त्यांच्याशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी

आरोपी सोबतचे संबंध बिघडू शकतील या भीतीने खोटी साक्ष देत आहे. माझा आरोपीच्या प्रकरणांशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – श्री. ए. जी. पाटील वकील.**

**४.** मी मागील २५ वर्षे गावचा पोलिस पाटील म्हणून कामकाज पाहिले आहे. माझे पोलिसांशी केवळ कामापुरते संबंध आहेत. मी पोलिसांनी बोलावल्यावर जात असतो. दि.०३.०५.२०२४ रोजी फिर्यादीचा मुलगा गावात आलेला होता. मला त्या दिवशी ते दोघे शेतामध्ये लाकूड तोडण्यासाठी गेल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यासाठी गेल्याचे खोटे सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १५.१२.२०२५.                    (आर. पी. थोरे)

आजरा.                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव** – दशरथ आप्पा चौगुले.

**वय** – ५३ वर्ष, **व्यवसाय** – शेती,

**राहणार.**– मेंढोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

## सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.

१. माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. आरोपी माझा सख्खा भाऊ आहे. आमच्यामध्ये आमच्या वडिलार्जित मिळकतींची १९९९ साली वाटणी झाली आहे. दि.०३.०५.२०२४ रोजी सकाळी ०८.३० वाजेच्या दरम्यान *मानेचे टेक* मधील गट क्र.१८६ कडे लाकडे तोडण्यासाठी गेलो होतो. मी शेतातील दोन लाकडे तोडत असताना आरोपीने येऊन, 'तू या शेताकडे यायचे नाही' असे म्हणून माझ्या हातातील कोयता काढून माझ्या डाव्या पायाच्या गुडघ्यावर मारला होता. त्यानंतर मी आरडाओरडा केल्यामुळे आणि माझ्या पायातून आलेले रक्त पाहून तो तेथेच कोयता टाकून पळून गेला होता.

२. मी त्यानंतर माझा मित्र असलम बुड्डेखान याला फोन करुन गाडी घेऊन यायला सांगितले होते. तो आल्यावर त्याने मला पोलिस ठाण्यात आणले होते. तेथून पोलिसांनी मला आजरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी पाठवले होते. तेथे डॉक्टरांनी माझ्या जखमेवर टाके घालून देखील रक्त थांबत नसल्यामुळे त्यांनी मला रुग्णवाहिकेने गडहिंग्लजच्या सरकारी दवाखान्यात पाठवले होते. मी तेथे उपचार घेऊन आल्यावर पोलिसांकडे तक्रार दिली होती.

३. आता मला मी दिलेली तक्रार दाखवली, त्यावरती माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तिला **नि. क्र. पी. ११** देण्यात येतो. मी तक्रार दिल्यानंतर दुस–या दिवशी पोलिस पंचनामा करण्यासाठी आले होते. त्यावेळी पंचनाम्यासाठी जितेंद्र नांदवडेकर व मारुती नाईक हजर होते. मी पोलिसांना झाड, जागा, कोयता दाखवून चतुःसिमा सांगितल्या होत्या. पोलिसांनी तेथून मी दाखवलेला कोयता जप्त केला होता. आता मला पोलिसांनी केलेला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला. त्यावरती माझी, दोन पंच आणि पोलिस कर्मचा–याची स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी. १२** देण्यात येतो.

४. मी पोलिसांनी घटनास्थावरुन जप्त केलेला कोयता दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला तो कोयता दाखवला. तो तोच आहे. साक्षीदाराने कोयता ओळखल्यामुळे त्याला **वस्तू क्र. अ** देण्यात येतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. आरोपीला माझी चांगली केलेली जमीन घ्यायची असल्यामुळे त्याने मला मारहाण केली असून त्याबाबत दिवाणी दावा देखील केलेला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – श्री. ए. जी. पाटील वकील.</u>**

**५.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या विरोधात मी आई–वडिलांनी वाटून दिल्याप्रमाणे वागत नसल्या बाबत दिवाणी दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आमच्यातील वाटपाबाबत आरोपी विरोधात वेगवेगळया तक्रारी केल्या आहेत. आरोपीने माझ्या विरोधात त्याला मारहाण केल्याबाबत खोटया तक्रारी दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि.०३.०५.२०२४ रोजी माझा मुलगा घरी आला होता. माझा मुलगा मिरज मध्ये कामाला आहे.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी व माझा मुलगा शेळी घेऊन चारण्यासाठी शेतामध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्या प्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी शेताकडे लाकडे तोडण्यासाठी गेल्याचे खोटे सांगत आहे. मी पोलिसांना जबाब देताना, आरोपीने मारहाण केल्यामुळे *आरडाओरडा* केल्याची व *रक्त पाहून* पळून गेल्याची बाब सांगितली नव्हती.

७. मी आरोपीने मारहाण केल्यानंतर शेतातून मित्राला फोन केला होता. मी पोलिसांना जबाब देताना मित्राला शेतातून फोन केल्याची बाब सांगितली होती. आता मला माझा जबाब वाचून दाखवला, त्यामध्ये सदर बाब नमूद नाही. मला त्याचे कारण सांगता येणार नाही. माझे गावामध्ये जवळचे व ओळखीचे लोक आहेत.

प्रश्न – तुमच्या शेतात गावातून व्यक्ती लवकर येऊ शकते का आज–यातून ?

उत्तर – गावातील व्यक्ती लवकर येऊ शकते, परंतु मी असलमला माझा मित्र असल्यामुळे त्याला फोन केला होता.

८. असलम आज–यात टेलरींग काम करतो. मी त्याला टेलरींग कामात मदत करत

असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी असलमला माझ्या व आरोपीच्या वादा बाबत सांगितले आहे.

**९**. घटनेच्या दिवशी आमच्या गावातील शाळेजवळील रस्त्याचे काम चालू होते. आरोपी आमच्या गावातील रोजगार हमीची कामे घेतो. आरोपी आमच्या गावचा रोजगार हमी सेवक आहे. मला घटनेच्या दिवशी आरोपी रोजगार हमीचे मजूर कामावरती घेऊन गेल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी शेतामध्ये आल्याचे खोटे सांगत आहे.

**१०**. पोलिसांनी घटने दिवशी माझे कपडे जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मला लाकडे तोडताना हातातील कोयता पायाला लागल्यामुळे जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या जखमेचा गैरफायदा घेण्यासाठी आरोपी विरोधात खोटी केस केली आहे. वस्तू क्र. अ प्रमाणे सर्व शेतक–यांकडे कोयते असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना पंचनामा करताना वस्तू क्र. अ वरील कोयता दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा करताना घटनास्थळी कोयता पडलेला नव्हता.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी घटनास्थळी कोयत्याचा पंचनामा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी लाकडे तोडायला गेल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी असलम बुड्डेखानला बोलावून घेतल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १५.१२.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.